त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

खंड ६१, अंक १, शक १९०४

QUARTERLY

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 61, No. 1, July 1982

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकाचे प्रकाशन नोव्हेंबर १९२० सालापासून सुरू झाले. त्रैमासिक मुख्यत्वेकरून भारताच्या इतिहाससंबंधीची निरनिराळ्या भाषांतील मूळ, अस्सल ऐतिहासिक साधने उजेडात आणते. तसेच या इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास करणारे संशोधन लेख प्रकाशित करते.

The Quarterly of the Bharata Itihasa Samshodhaka Mandala was started in November 1920. Since then the Quarterly has been publishing mainly original source-material available in different languages, and also research articles relating to various aspects of Indian history and culture.

त्रैमासिक

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

खंड ६१, अंक १, शक १९०४

QUARTERLY

of the

Bharata Itihasa Samshodhaka Mandala, Pune

Vol. 61, No. 1, July 1982

ऋणनिर्देश : महाराष्ट्र साहित्य संस्कृति मंडळाकडून या अंकासाठी त्याच्या नियमानुसार अनुदान मिळाले आहे.

वार्षिक वर्गणी – रुपये दहा

* * *

* * *

प्रकाशक : म. श्री. माटे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

अनुक्रमणिका

■ ■ ■

चित्रे व नकाशे

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६१ : १, जुलै १९८२

समर्थ रामदासविषयक संशोधनाची साधने व हिंदुस्थानी श्लोकाष्टके

इंदुमती लिमये
मुळजी जेठा महाविद्यालय, जळगाव

महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर, श्रीसमर्थ रामदास विषयक संशोधनाला प्रारंभ होऊन बराच काळ लोटला आहे. आणि या सुमारे शंभर वर्षांच्या काळात श्रीसमर्थ रामदास विषयक बरीच हस्तलिखिते संशोधकांनी मिळविली आहेत. व त्यापैकी समर्थ साहित्य बरेचसे प्रकाशितही झालेले आहे. तरीही अजून हे काम संपले आहे असे म्हणता येत नाही. या निबंधात श्री रामदासविषयक जी हस्तलिखिते उपलब्ध आहेत त्या संदर्भात प्रामुख्याने मी विचार करणार आहे. या निबंधाचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात सर्वसाधारण चर्चा असून, दुसऱ्या भागात 'हिंदुस्थानी श्लोकाष्टके' या विषयी लिहिले आहे.

१. संशोधनाची साधने

श्रीरामदासविषयक संशोधकांत धुळ्याच्या श्री. शं. श्री. देवांनी केलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला त्यांनी आपल्या कामाला प्रारंभ केला. तत्पूर्वी १८९०-९१ चे सुमारास बाबाजी अनंत तेंडुलकर हे 'श्रीसमर्थ रामदास चरित्र व समग्र ग्रंथ' या नावाचे मासिक काढीत असत. त्यात उद्धवसुत कृत व आत्माराम बोवा कृत चरित्र वाचण्यात आले अशी नोंद देवांनी 'श्रीरामदासी संशोधना'च्या प्रथम खंडाच्या सुरुवातीला केली आहे. म्हणजेच तत्पूर्वी महाराष्ट्रातील संशोधकांचे लक्ष इकडे वेधले होतेच. स्वतः श्री. देवांनी महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर फिरून फार साक्षेपाने व कष्टाने शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्या शोधात केवळ मठ, मठपतीच नव्हे तर जेथे कोठे कोणत्याही रूपात पोथ्या मिळण्याची शक्यता वाटली तेथे तेथे जाऊन पुन्हा पुन्हा जाऊन, तो संग्रह हस्तगतच केला, अगदी अशक्य झाले तेथे प्रयत्नपूर्वक प्रत करून घेतली. या संशोधनाच्या कामात आलेले अनुभवही देवांनी व्यक्त केले आहेत. स्वाभाविकच श्री. देवांनी मुखपत्र म्हणून चालवलेल्या 'रामदास आणि रामदासी'च्या अंकातून व नंतर ग्रंथरूपाने श्रीसमर्थ, समर्थ शिष्य प्रशिष्य, मठ (भौगोलिक स्थानासह),

मठपरंपरा, मठपती, श्रीसमर्थांचे ग्रंथ, शिष्य प्रशिष्यांचे सांप्रदायिकांचे ग्रंथ अशा संदर्भात पुष्कळच साहित्य प्रसिद्ध झाले आहे.

देवांनी गोळा केलेले हे साहित्य २२८७ बाडांत सध्या धुळयाला श्री वाग्देवता मंदिरात एकत्र ठेवलेले आहे. त्या साहित्याची व त्या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची चिकित्सा करून व्यवस्थित अभ्यास करायला हवा आहे. श्रीसमर्थांचे चरित्रसुद्धा चिकित्सक वृत्तीने लिहिले जाण्याची गरज आज भासत आहे. त्याशिवाय संप्रदायविषयक व शिष्य प्रशिष्यांच्या ग्रंथविषयकही अनेक प्रश्नांचा उलगडा व्हावयाचा आहेच. त्यांतील दोन तीन गोष्टींकडे मी अभ्यासूंचे लक्ष वेधणार आहे.

परंतु तत्पूर्वी आणखी एका गोष्टीचा उल्लेख येथे आवर्जून करावयाचा आहे. श्री. देव व त्यांचे सहकारी यांनी वाचून, ज्या बाडांची नोंद केली आहे अशी वर उल्लेखलेली बाडे व त्या शिवाय निव्वळ संस्कृत-उपनिषदे, महाभारत, गीता, निघण्टु, अनेक प्रकारच्या टीका अशी अनेक विषयांवरची ८६३ बाडे सोडून, ज्यांची सोय लावायला देवांना अवसर मिळाला नाही अशी ऐतिहासिक कागदपत्रे वाग्देवता मंदिरात पडून आहेत. त्यात बालबोध, मोडी सर्व प्रकार आहेत. त्यातही श्रीरामदासविषयक कागद असू शकतील. इतर अभ्यासाच्या दृष्टीनेही या कागदपत्रांचे संशोधन व्हायला हवे आहे.

श्रीसमर्थ रामदासांचा अभ्यास करताना एका गोष्टीचा प्रथम उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे रामदासांच्या चरित्राचा पुन्हा एकदा चिकित्सकपणे मागोवा घ्यायला हवा आहे. श्रीसमर्थांची जुनी चरित्रे दुर्मिळ असली तरी उपलब्ध आहेत. त्यातील अद्भुत चमत्कार बाजूस सारून, डोळसपणे या चरित्र ग्रंथाचा विचार करणे वर्तमानकाळात अगत्याचे आहे. हे करताना पूर्व कल्पना आणि परंपरागतता बाजूस सारून नव्याने विचार केला पाहिजे. त्यामुळे काही वेळा जुन्या कल्पनांना धक्का बसेल. पण श्रीसमर्थ रामदास ही एक सामाजिक विभूती आहे हे लक्षात घेऊन ते करायला पाहिजे. ‘ समर्थांनी आपले जन्म गाव-जांब का सोडले ? ’ या प्रश्नाच्या संदर्भात मी माझ्या ‘ श्रीसमर्थ साहित्य-उद्देश आणि प्रेरणा ’ या लेखात साधार विचार व्यक्त केला आहे. आणखी विचार व्हायला हवा आहे. तो डोळस व चिकित्सकपणे व्हावा याबद्दल दुमत असणार नाही.

याच संदर्भात आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती म्हणजे-जुन्या हस्तलिखितांतून सलग चरित्राशिवाय समर्थांवर अनेक पदे मिळतात. कल्याण, अनंत, रंगनाथ, शिवदीन केसरी, वामन पंडित अशा अनेकांची पदे स्फुट रूपात उपलब्ध आहेत. एकाच २३७ व्या बाडात समर्थ स्तवनपर पाच अष्टके मिळून ४२ श्लोक आहेत. काही समकालीनांची, काही उत्तरकालीनांची, काही मराठी, काही संस्कृत अशी ही पदे आहेत. याचा एकत्र विचार केल्यास व्यक्ती म्हणून समर्थ विषयक एक आलेख कालदृष्टया हाती येईल. तो महत्त्वाचा म्हणावा लागतो. काही वेळा चरित्र विषयक घटनांच्या संदर्भातही वेगळी नोंद मिळते. ती तशी का, म्हणजे गैरसमजुतीने का अन्य काही कारणाने, याचा छडाही लावणे जरूर आहे. उदाहरणार्थ, समर्थांच्या

निर्याण शकाची नोंद बीड मठातल्या ७६३ क्रमांकाच्या बाडात–अनंत कवीच्या शिष्याने ‘ सोळाशे वरी पंच अब्दगणना माघ तिथीचे दिनी–तिथी ते नवमी ’ अशी, म्हणजे १६०५ माघ वद्य नवमी अशी केली आहे. ही नोंद श. १७१९ मधील आहे. डोमगाव मठातील कल्याण स्वामींच्या पदांच्या एका बाडात ही (हे बाड १५० वर्षांपूर्वीचे आहे) अशी नोंद आढळते. त्या लेखकाने–‘ सोलासे वरी पांच जाण रुधिरो द्धाराते संवत्छरी माध्यान्ही आणि माघ वद्य नवमी त्या इंदुवारातरी ’। असे म्हटले आहे. दोन्ही ठिकाणी तिथी माघ वद्य नवमी असून शक १६०५ आहे. हा फरक का पडतो आहे ? देवांनी फक्त विचार केला पाहिजे एवढेच म्हटले आहे. प्रत्यक्ष हस्तलिखित पहाता या नोंदी स्पष्ट आहेत व दोन वेगळ्या मठांतल्या आहेत. या महत्त्वाच्या घटनेबाबत असा फरक पडावा, आणि तो कल्याणांनी लिहिलेल्या पदांच्या वहीत नोंदवलेला असावा हे पाहून आश्चर्य वाटते. समाधीचे स्थान व तिथी मात्र बरोबर आहेत. बाड क्रमांक ५८ मध्ये पदे हस्ताक्षरावरून कल्याण स्वामींनी उतरवलेली आहेत. जेथे समर्थ निर्याण शकाचा मजकूर लिहिलेला आहे ते अक्षर वेगळे वाटते, पण ते कोणी लिहिले, याबद्दल उल्लेख नाही. समाप्तिदर्शक नोंद नाही. ३३८ क्रमांकाच्या बाडात समर्थ निर्याणपर जो मजकूर आला आहे, त्यात नंतर पट्टीवर म्हणजे मठाधिपतीच्या गादीवर कोणी बसावे या बद्दलचा उल्लेख आहे. त्यात अद्भुताचा भरणा अधिक दिसतो. या नोंदीचा एकत्र विचार केला पाहिजे.

वरील ३३८ क्रमांकाच्या बाडातच – ‘ माझी काया गेली खरे परी मी आहे जगदाकारे ’ हा अभंग शिष्य तिसऱ्या दिवशी राख सावडायला गेले, तेव्हा चितेतून उमटला व कल्याणांनी तो लिहून घेतला असा उल्लेख आहे. हे अद्भुतात जमा होणारें आहेच. शिवाय, निर्याण समयी कल्याण तेथे नव्हते. ६२६ क्रमांकाच्या बाडात वरील अभंग आकाशवाणी होऊन ऐकू आला असा उल्लेख सापडतो. म्हणजेच अशा उल्लेखांची ही नोंद तपासून घेतली पाहिजे. ऐतिहासिक कागदपत्रात काही निर्णायक माहिती मिळते का याचा तपास होणे जरूर आहे. श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरातली हस्तलिखिते मी त्या दृष्टीने तपासत आहे.

या हस्तलिखितांचा तपास घेताना मला आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. तो म्हणजे ‘ श्रीदासबोधाचे मुख वस्त्र ’. या मुख वस्त्राच्या एकूण अकरा प्रती मला तेथे मिळाल्या. ७९ ओव्यांची संहिता असलेल्या दहा प्रती व २५ ओव्यांची संहिता असलेली एक प्रत. टांकळी, पांघरी, डोमगांव, इंदुरबोधन, चाफळ खोरे अशा वेगवेगळ्या बाडांतल्या मठातील कागदात या प्रती मिळतात. त्यात ८ प्रती पूर्ण असून त्यातील तीन प्रती दासबोध ग्रंथावर आहेत. १८७२ क्रमांकाच्या बाडातील प्रतीत फक्त ‘ श्री रामदास विरचित् ’ असा उल्लेख आहे. पाठभेदासहित संहिता मी तयार केली असून प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. श्री दासबोध ग्रंथात कोठे काय सांगितले आहे याविषयी या मख वस्त्र कर्त्याने मार्गदर्शन केलेले दिसेल. दासबोधाच्या

पाठावृत्तीसंबंधीही विचार करावयाचा आहे.

परंतु तत्पूर्वी मंदिरातील हस्तलिखितात समर्थलिखित ' मुसलमानी अष्टके ' म्हणून ८० श्लोक अप्रकाशित आहेत. त्याचा उल्लेख करावासा वाटतो. ही अष्टके गेय आहेत. ती जरी हिंदुस्थानी भाषेत असली तरी बोलभाषा असल्याने मराठी, संस्कृत, उर्दू या भाषांची त्यावर छाप आहे. ती ' सदुकडी ' भाषा असल्याचे हिंदी जाणकारांचे म्हणणे आहे. ' रामदासलिखित ' आहेत हे निश्चित आहे. त्याची एकच प्रत अजून तरी उपलब्ध झाली आहे. ही अष्टके मुसलमान अनुयायांकरिता लिहिलेली दिसतात. या अष्टकाच्या अभ्यासाने नवा प्रकाश पडण्याचा संभव आहे. अर्थ लावण्याचा प्रयत्न चालू आहे. ज्याने कोणी ही अष्टके नकललेली आहेत तो जाणकार नसावा असे लेखनावरून दिसते. मनाच्या श्लोकांतल्या आशयाशी काही ठिकाणचा आशय जुळतो.

यावरून एक गोष्ट उघड आहे की समर्थ रामदासलिखित सर्वच साहित्य प्रसिद्ध झाले आहे असे म्हणता येत नाही. काही मराठी पदेही अप्रसिद्ध असण्याचा संभव हस्तलिखितावरून दिसतो. पदाशिवाय ' ईश्वर विवाद ', ' सदवद ', ' ज्ञानबोध ' ' अन्वय व्यतिरेक ' अशी काही प्रकरणे समर्थांची असल्याचा उल्लेख बाडात मिळतो. अभ्यासूंनी एकत्र बसून यासंबंधी निश्चित निर्णय केला पाहिजे.

तसाच विचार दासबोधाच्या पाठावृत्तीचा केला पाहिजे. दासबोधाच्या आवृत्तीचे संपादन पूर्ण होऊन श्री रामदासांनी स्वहस्ते शोध घातलेच असतील तर ती आवृत्ती निश्चित कोणती ? डोमगावच्या मठातील कल्याणस्वामींची म्हणून मानलेली जी प्रत, त्याची त्याबरहुकूम केलेली प्रत वाग्देवता मंदिरात आहे. त्याचा बारकाईने शोध केला; प्रत्येक पान उलगडून पाहिले. प्रतीच्या शेवटी देवांनी जे शेरे दिले आहेत, ते लक्षात घेता डोमगावची प्रत ही कल्याणस्वामींची एकट्याच्या हातची नव्हे हे उघडच आहे. प्रत दोन लेखकांची असल्याचा उघड पुरावा मिळतो. बाह्य पुरावा स्पष्टपणे दाखवता येतोच. पण त्याशिवाय, ६×५ मधील ५७ ते ६० या तीन ओव्यांचा गोंधळ, ५×६.६२ ९×३.४०, १०×१०.४८, १२×१.४, १७×५.८, १९×८.७ ह्या ओव्यांचे गोंधळ मी टिपले आहेत. अशा सात ठिकाणी संपूर्ण ओव्या चुकीच्या अथवा मागेपुढे लिहिल्या जाऊन नंतर दुरुस्त केलेल्या आहेत. कित्येक ठिकाणी खाडाखोड आहे, हरताळ लावून वर लिहिलेले आहे. चरण, शब्ददुरुस्ती अनेक ठिकाणी आहे. म्हणजे ही प्रत कल्याणांची असे म्हणणे कठीण आहे. (दोन लेखक असल्याचे तर स्पष्ट आहेच.) या प्रतीत घातलेले हे शोध, वाग्देवता मंदिरात ' निंबराजबवाकडील पोथा ' म्हणून एक प्रचंड बाड १५८ क्रमांकाचे म्हणून उपलब्ध आहे, त्यात दासबोधाची प्रत आहे,– त्या प्रतीबरोबर ताडून पाह्यले. तेव्हा त्या लेखकाने केलेल्या दुरुस्त्या लक्षात घेऊन ही संहिता तयार केलेली दिसते. केवळ दासबोधच नव्हे तर, सर्व पोथा अगदी व्यवस्थित लिहिलेला दिसतो. तो एकाच लेखकाचा असावा. खाडाखोड तर नाहीच. अक्षरही चांगले आहे. हा पोथा शके १७१९ मधील आहे. म्हणजे संप्रदायात तेव्हा

असे साक्षेपी लेखन केले जात होते असे म्हणता येते.

ग्वाल्हेर येथे दत्तात्रेय स्वामींच्या परंपरेतली १६०६ ची दासबोधाची आवृत्ती आहे हे सर्वश्रुत आहे. ती मी पाह्यली आहे. पण हस्ताक्षराच्या दृष्टीने वगैरे अभ्यासलेली नाही. पांगारकरांनी यावरूनच दासबोध छापला. त्यात पाच ओव्यांचा फरक आहे. दासबोधाच्या उपलब्ध हस्तलिखित प्रतीत असा ओव्यांचा फरक इतरत्रही पडतो. ' फूट समास ' कोणत्याही दशकातले मिळतात. त्यामुळे त्यावरून कोणतेच अनुमान काढता येत नाही.

दासबोध रचनेच्या संदर्भात अभ्यासूंनी केलेल्या विचारापेक्षा जरा वेगळा विचार, अंतर्गत पुराव्यावरून मी केला आहे. दशक ७, ८, १९ आणि २० या चार दशकांच्या संदर्भात मी केलेला विचार रामदासस्वामींच्या विचाराच्या संगतीला पूरक म्हणून सांगता येतो आणि मीमांसाकारांची ' उपक्रमोऽप संहारा ' ही व्याख्या लावून दाखवता येते. हे साधार विवेचन मी एका लेखात व माझ्या प्रबंधात केले आहे. प्रस्तुत निबंधाची मर्यादा लक्षात घेऊन येथे ते केले नाही. रचनेच्या संदर्भात मी केलेल्या विचारांच्या अनुषंगाने दासबोधाची जुळणी एकदा करावी असाही एक धाडसाचा विचार कधी तरी मनात येऊन जातो.

श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात असलेल्या हस्तलिखितांच्या संदर्भात आणखी एका गोष्टीकडे मला अभ्यासूंचे लक्ष वेधावयाचे आहे. ते म्हणजे सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या पोथ्यांत वर उल्लेखलेल्या श्रीसमर्थ रामदास, त्यांचे शिष्य-प्रशिष्य आणि इतर सांप्रदायिक, यांचेशिवाय ज्ञानेश्वर-तुकारामापासून अनेकांचे साहित्य सापडते. केवळ ललितच नव्हे तर व्याकरणविषयक, ज्ञानेश्वरीची परिभाषा, औषधविषयक, काही पत्र व्यवहार–अनेकपरीचे ते साहित्य मराठी, हिंदी, संस्कृत, उर्दू, कन्नड अशा विविध भाषांत आहे. महाराष्ट्र सारस्वताच्या अभ्यासकांना त्याकडे लक्ष द्यावयास हवेच आहे. ऐतिहासिक दृष्ट्याही ते महत्त्वाचे आहे. श्री. देवांनी आपल्या संशोधन खंडात त्याची अनुक्रमाने नोंद केलेली आहे. परंतु संशोधकाला पाहिजे असलेला तपशील कोठे मिळेल ते चटकन् सापडावे म्हणून या तिन्ही खंडांची एकत्र लेखकनिविष्ट सूची प्रसिद्ध करावयाची आहे. कच्चा आराखडा तयार आहे. ही नवी सूची प्रसिद्ध झाली तर अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय निश्चितच होणार आहे. या बाडांचे जतन करण्याचा प्रयत्न विश्वस्तांनी काहीसा चालवला आहे. तरी अजून पुरेशी व सर्व साधन-सामग्री उपलब्ध झाली आहे असे म्हणता येत नाही.

वाग्देवता मंदिरात अलीकडे जमेल तसे काम करण्याचा प्रयत्न मी करीत असल्याने या निमित्ताने त्याबाबतीत मी माझे विचार थोडक्यात मांडण्याचा येथे प्रयत्न केला आहे. जुन्या लेखकाच्या संदर्भात हस्तलिखिताचे मोल किती असेल ते अभ्यासूंना मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही.

रामदासस्वामींसंबंधी अभ्यासविषयक साधने म्हणून मठाचा विचार निःसंशय

महत्त्वाचा आहे. पण लावला गेलेला शोध विचारात घेता– नवीन मिळालीच तर काही हस्तलिखिते मिळतील एवढाच संभव वाटतो. मठाच्या संदर्भात एक संख्येचा प्रश्न सोडला तर तसे काही महत्त्वाचे मतभेद नोंदवलेले नाहीत. घळींचा विचार देवांनी बराच तपशिलवार दिला आहे. प्रत्यक्ष पाहणे शक्य झाल्यास विवेचन साधार होईल पण तो योग अजून तरी आलेला नाही. संप्रदायविषयक विचारांची मात्र बरीच ओढाताण पुस्तकातून झालेली दिसते. हस्तलिखिताच्या सहाय्याने त्याचाही एक निश्चित विचार झालेला बरा. मूळ विचार व नवीन परंपरा यांची छाननी फार महत्त्वाची ठरेल.

समर्थ रामदास स्वामींचे वैचारिक दर्शन उपलब्ध साहित्याच्या आधारे आजपर्यंत अनेकांनी वेगवेगळया दृष्टिकोणातून घडविले आहे. वर्तमान कालाच्या दृष्टीने नवनवे पैलू या अभ्यासात सापडतात. बहुतेक साहित्य प्रकाशित झालेले असल्याने त्याच्या सहाय्याने हे विचारमंथन चालूच आहे. आणि तसे पाहता रामदासस्वामींची ही वाङ्मयी मूर्तीच अधिक महत्त्वाची आहे. असो. तरीही समाज-मानसात कोणत्याही चमत्काराच्या कल्पनेला थारा न राहू देता, खऱ्याखुऱ्या अर्थाने रामदासांच्या ऐतिहासिक कार्याचे मूल्यमापन व तत्संबंधीचे विवेचन होणे आवश्यक आहे.

२. हिंदुस्थानी श्लोकाष्टके

धुळयाच्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात काम करताना बाड क्रमांक ६६८ मध्ये श्रीसमर्थ कृत श्लोकाष्टके [मुसलमानी] अशी देवांनी नोंद केलेली आढळली. म्हणून मुद्दाम हस्तलिखित पाहिले. ‘ कविता ’ आजपर्यंत अप्रकाशित आहे. व ती रामदास स्वामींचीच असावी असे मला वाटले. त्याला कारणे दोन–एक तर, ‘ कहे रामदासो ’ असा स्पष्ट, बहुतेक प्रत्येक कडव्याच्या शेवटी आलेला उल्लेख. दुसरे म्हणजे, वैचारिक साम्य. विचार व्यक्त करण्याची पद्धत. ही हिंदुस्थानी कविता, म्हणजे श्लोक, २० पानांपर्यंत असून नंतर स्वामींची मराठी कविता येते. हा पण एक पुरावा म्हणून म्हणता येईल. श्रीसमर्थांनी हिंदी कविता लिहिण्याचे उल्लेख तर येतातच. या सर्व कारणामुळे ती समर्थ रामदास स्वामींची आहे असे माझे निश्चित मत झाले. अर्थात बाडातील प्रत्यक्ष हस्ताक्षर स्वामींचे नाही. इतकेच नव्हे तर ते कोणीतरी अशिक्षित व्यक्तीने नकलले आहे. त्यामुळे कवितेचा अर्थ लावण्यास फारच त्रास होतो. शब्द नीटपणे लिहिण्याचे ज्ञान नसल्याने तो कोठेही तोडलेला आहे. परंतु या श्लोकातील मजकूर लक्षवेधी आहे.

हे बाड म्हणजे एक साधी शिवलेली वही आहे, व ते [क्रमांक ६६८ रामदासी संशोधन भाग २] बाड मठातील आहे. ते अतिशय जीर्ण असून श्री. देवांनी ते त्यावेळी २०० वर्षांपूर्वीचे (म्हणजेच आता २५० वर्षे) असल्याचे म्हटले आहे. वर म्हटल्याप्रमाणे देवांनी स्पष्टपणे ‘ श्रीसमर्थकृत मुसलमानी श्लोकाष्टके ’ असे म्हटले आहे. श्लोकाष्टके असे देवांनी का म्हणावे याचा मला उलगडा होत नाही. बाडात फक्त

' श्लोक मुसलमानी ' असे म्हटलेले आहे. कोणत्याही संचात ८ श्लोक नाहीत. ते ५, ५, १७, ६ असे कसेही आहेत. वैचारिक दृष्टया हे गुच्छ काटेकोरपणाने वेगळे केले आहेत असेही नाही. नकलून घेणाऱ्याचा गोंधळ असल्यास नकळे. ही भाषा केवळ शुद्ध हिंदी म्हणावी अशी नाही. ती ' सदुकडी ' आहे असे हिंदी जाणकारांचे मत पडले. त्यावर मराठी संस्कृतची छाया आहे. काही शब्द फारशी आहेत. अशुद्धे सर्वत्र आहेतच. वाचताना बरीच मोडतोड करावी लागते. अर्थ करताना हिंदी तज्ञांची मदत घेतल्याशिवाय गत्यंतरच नाही. पण ही कविता अप्रकाशित असल्याने, आहे त्याच रूपात अर्थासहित प्रकाशित करावी असे वाटते. अजून सर्व गुच्छांचा अर्थ लावून झालेला नाही. मूळ हस्तलिखित वाग्देवता मंदिरात आहे. ते एकच असल्याने पाठभेदाचा वगैरे प्रश्न अजून तरी निर्माण होत नाही. मराठी मनाच्या श्लोकासारखे कवितेचे स्वरूप आहे. ती गेय आहे. सुरावर नीट म्हणता येते. अशी म्हणताना काही वेळा शब्दांची जुळणी आम्हाला करता आली. प्रत्येक चरणात बारा अक्षरे आहेत. क्वचित एखादे जास्त येते. वचारिक दृष्टया मनाच्या श्लोकाशी तर साम्य आहेच पण त्याशिवाय राममंत्राचे श्लोक, जनस्वभाव, गोसावी, पंचमान, दासबोध, या साहित्यात काही साम्य स्थळे सापडतात. तरी पण हे श्लोक मुसलमान समाजाकरिता लिहिलेले असल्याने त्या धोरणाने विचार व्यक्त झालेले आहेत. कुफराना, अल्ला, इलाही, फकिरी, पीर, आलख, भाईबंदगी, दिवाना, चांदतारा, खुदा असे काही शब्द तात्काळ लक्ष वेधून घेतात. तो ' इलाही ' हिंदू नाही वा मुसलमान नाही; तो जातीच्या बाहेरच आहे; जात गोत त्याला नाही, असे स्पष्ट विचार या श्लोकातून समर्थ व्यक्त करताना दिसतात. तो सगळ्यांत श्रेष्ठ आहे, हे ते आवर्जून सांगतात. राम रहीम एकच आहे म्हणून सांगतात.


श्री समर्थांचा म्हणून कानफाटया ल. र. पांगारकरांनी दिलेला आहे. त्यात ' आलेख जागो ' म्हणून उल्लेख येतो. या श्लोकांतून सुरुवात ' आलख ' अशीच आहे. या श्लोकामधील भाषा बोलभाषा आहे हे तर उघडच आहे.

पहिला गुच्छ पाच श्लोकांचा आहे. विचार एक सलग येत असून, पाचव्या श्लोकाच्या शेवटी ' कहे रामदासो। ईलाहि सही हे ' असे म्हणून विचार पूर्ण केला आहे. बाकी पहिल्या चार कडव्यांत ' मुसेहि कहे सानूहि वो ईलाही ' असे धृपदासारखे म्हटले आहे. हे साम्य ही मनाचे श्लोकाचे आहे. हे सहजच जाणवते. ' अरे, तो अलख निरंजन कसा आहे ? ' असा पहिल्या ओळीत प्रश्न असून पुढे त्याचे उत्तर आहे. तो अलख–कशा सारखाच नाही तर काय. सांगू–त्याला रंग रूप आकार नाही. त्याचे स्वरूप तोंडाने सांगता येणार नाही. हिरवा, पिवळा, काळा, पांढरा कसलाच रंग त्याचा नाही. जसे त्याचे रंग रूप तोंडाने सांगता येणार नाही तसा तो दाखवताही येणार नाही. बघणाराला बघता तरी कसा येणार ? त्याला जन्म–मृत्यू नाही. आपण त्याला डोळयांनी म्हणजे चर्मचक्षूने पाहिले असे जे कोणी म्हणतात ते असत्य. त्याला जाणायचा तर तो फक्त ' आकलसे ' ज्ञानाने जाणता येतो. खरा साधूच त्याचे रूप जाणवून देऊ

शकतो. आमच्या गुरूंनी आम्हाला या निराकार अल्लाची भेट घडवून दिली व त्यानेच या ज्ञानाने मला इतरांपेक्षा वेगळे केले. थोडक्यात एवढा विचार या पाच श्लोकात आला आहे. काही ओळींचे साम्य मनाचे श्लोकाशी इतके नजरेत भरते की हे श्लोक रामदासांचे याबद्दल शंकाच राहू नये. उदा०, मनाचे श्लोकात ते म्हणतात : नसे पीत ना श्वेत ना श्याम काही नसे व्यक्त अव्यक्त ना नील काही। तर या हिंदुस्थानी श्लोकात समर्थ म्हणतात : हरा ना पिला रंग काला नही रे, सिफेल्दी नहिं क्या कहुं मे ईसेरे। तसेच, 'निराभास निर्गुण ते आकळेना। अहंता गुणे कल्पिताही कळेना' आणि 'गुरू अंजनेवीण ते आकळेना। तया पहाता वेगळे राहवेना,' 'गुरुवीण तो सर्वथाही न दीसे। जनी ज्ञानिया तोचि साधू अगाधू,' अशी साम्य स्थळे अभ्यासूंना सहज सापडतील.

याच विचाराचा पुढला भाग, काहीसा विरोधातून या विचारांची सत्यता पटवणारा, पुढल्या पाच श्लोकांत येतो. तो असा : चमत्कार करणारा, करामतवाला मुल्ला, हा दिवाना भ्रान्तिष्ट म्हटला पाहिजे. चमत्काराचे जगत् हे काही खरे जग नव्हे. ते कावळ्याला हंसाची प्रतिष्ठा प्राप्त करून देते. भूते वा क्षुद्र देवता यांची करामत ही मुळीच खरी नाही. त्याची बंदगी, सेवा, तू करू नकोस. तो खरा मार्ग नव्हे. त्या मार्गाने जाऊन तुला 'इलाही' मिळणार नाही. या चमत्कार करणारांचे अधःपतन झाले आहे; असेच म्हटले पाहिजे. चांगले,सदाचारी लोक या मार्गांचा स्वीकार कधीच करीत नाहीत. हे करामत करणारे दुनियेला झुलवतात, भुलवतात. पण तू त्या मार्गाने जाऊ नको. हे भाई, हा मार्ग म्हणजे धर्म भ्रष्ट–'कुफराना' होय. त्यापासून फायदा नाही. तू आपल्या दिलाशी चांगला पंथ धर. या भलत्या मार्गाने जाऊ नकोस. (तो चांगला पंथ म्हणजे आधीच्या श्लोकात सांगितलेला. खऱ्या सद्गुरूच्या सहाय्याने जाणतेपणाने खरा इलाही समजून घ्यावा. 'तो' रंगरूप आकार–विरहित आहे).

या पाच श्लोकांतील विचारांशी मिळतीजुळती स्थळे मनाचे श्लोकात आहेतच. उदा. 'नव्हें चेटकू चालकू द्रव्यभोंदू। नव्हें निंदकू मत्सरु भक्ती मंदू।।' किंवा, 'राममंत्राचे श्लोक' या मधील, 'कलायुक्त चातुर्य ते वीकलारे। हरे राम हा मंत्र सोपा जपारे।', 'अपभ्रंश हा मार्ग की वोखटा रे। हरे राम हा मंत्र सोपा जपारे।' अथवा, 'नको चाकरी वारुगी त्या जनासी। हरी चिंतनी ध्यास लावी मनासी। नको फार मंत्राग्निच्या मंत्रदीक्षा। नको जारणादि मारणादि अपेक्षा।' श्री समर्थांचे 'जनस्वभाव गोसावी' हे स्फुट तर प्रसिद्धच आहे. त्यात या श्लोकात केलेल्या भूतादैवतांचा उल्लेख रामदास स्पष्टपणानेच करतात. मेसिके मायराणी, भूतला, दृष्टीबंधन विद्या, अनेक प्रकारचे चमत्कार असे अनेक उल्लेख येतात. इतकेच नव्हे तर 'करामती' असा शब्दही स्पष्टपणे येतो. 'ऐशा परीच्या करामती', अथवा, 'ऐशा नाना करामती भूमंडळी'. एवढे सांगून तेथेही रामदास म्हणतात, 'ऐसा वर्तता लोकी। येणे सार्थक नव्हे की।' तसेच, 'वोंगळपणाची स्थिती। स्वये ओंगळ करिती।' शुचिष्मंत महापंडिती मानिजेना। असे करामत दाखविणारे गुरू हे सद्गुरू नव्हेत असे



मध्यप्रदेश
ग्वाल्हेर परशुराम म
गुजराथ
बडोदा
लक्ष्मण महाराज
टाकळी
उध्दव स्वामी
दादेगाव
देवदास
दिनकरस्वामी
जांब
समर्थ रामदास स्व
बीड
गिरधर
माजलगाव
श्री समर्थ, वेणाबाई
केज
उध्दव
आंबेजोगाई
शिवराय
बालकराम
आळे
नारायणगाव
बाळकराम
सिंघणवाडी
समर्थ रामदास
शिरवळ नारायण बाजी
गोसावी
मर्ढे अमृतेश्वर
कण्हेरी वासुदेव स्वामी
पसरणी
वासुदेव स्वामी
सज्जनगड समर्थ रामदास स्वामी
चाफळ समर्थ रामदास स्वामी
केशव स्वामी
भीमस्वामी,
आप्पाजी बाबा
पांघरी
कल्याण स्वामी
डोमगाव
कल्याण स्वामी
भातंबरे
आप्पाजी बाबा
आपचद
आत्माराम महाराज
जगन्नाथ स्वामी
तळवळे
कुंडलवाडी
आत्माराम महाराज
वेणुबाई, सकुबाई
मिरज
पारगाव
शंकरजी
गोसावी
मनपाडळे
जयराम
अंबिकाबाई
शिरवडे
वाळवे
(प्रान्त)
अंबिकाबाई
कर्नाटक
मन्यार गुडी अनतमुनी
तेलंगण (प्रान्त) शिवराम
एकेहाळी आत्माराम महाराज

दासबोधातही म्हटलेले आहेच. 'पंचमान' मध्ये कुकर्मी घातकी लोकांना दुर्जन म्हटले आहे.

नंतरच्या म्हणजे पुढच्या गुच्छात एकूण सतरा श्लोक आहेत. परंतु, तीन श्लोकांचा एक भाग अर्थदृष्टया वेगळा करावा लागतो. त्यात, पवन म्हणजे वायू, सूर्य चंद्र तारे यांच्या संबंधी काही विचार येतात. फक्त हे सर्व म्हणजे अंतिम सत्य नव्हे, हा विचार दुरान्वयाने वरील विचाराशी थोडाफार जोडता येतो. एरवी हे श्लोक वेगळेच आहेत. चौथ्या श्लोकापासून मात्र पुन्हा वर व्यक्त केलेल्या विचाराशी सुसंगती आढळते.

या तीन श्लोकांत पवन–वायू, आकाश हा खेळच आहे असे म्हटले आहे. 'आवल्या पवनास वो खेल हेरे.' अवल–अव्वल म्हणजे प्रथम. प्रथम वायू, आकाश यांची निर्मिती झाली असा अभिप्राय असावा. तो दासबोधातील १२×६. १२, १६×७.२ यातील ओव्यांशी जुळतो. हे सर्व 'सही' म्हणजे सत्य आहे, असा या कडव्याचा शेवट होतो. पवन, तारे, चंद्र, सूर्य नेहमी फिरत असतात. वाऱ्याच्या सहाय्याने ढगही फिरतात. म्हणजे चलनाच्या पाठीमागे वारा असतो. आणि तो प्रथम निर्माण झाला व नंतर चंद्र, तारे, सूर्य वगैरे निर्माण झाले, ही कल्पना पुढे स्पष्ट केली आहे.

'पंचमान' या स्फुटात असाच विचार समर्थ सांगतात: 'त्रैलोक्य चालवी वायो। वायोस्तुती न बोलवे' किंवा, दासबोधात १६×६.१२ मध्ये, 'चंद्र सूर्य नक्षत्र-माला। ग्रहमंडळे मेघ माळा। ये ब्रह्मांडी नाना कळा। वायोकरिता॥' अथवा, 'धन्य धन्य हा वायुदेव। याचा विचित्र स्वभाव। वायोकरिता सकल जीव। वर्तती जनी॥' (१६ × ६.१).

मनाचे श्लोकात म्हटले आहे, 'वसे मेरु मांदार हे सृष्टी लीला, शशी सूर्य तारांगणे मेघमाला'. या श्लोकावरील चरणामुळे वरील श्लोकातील 'आवल्यांचा' संबंध–मेरुमांदारशी आहे की काय असाही एक विचार मनात येऊन जातो.

नंतरच्या पाच-सात श्लोकांत खुदा, त्यांचा बंदा, खरा ईलाही त्याला जाणणे, त्यासाठी गुरू देवाचे स्थान, माणसाच्या ठिकाणचा अहंभाव जो खऱ्या देवाला जाणण्यात आडवा येतो, नुसते तोंडाने 'देव देव' 'अल्ला अल्ला' करणारा बंदा, या कल्पनांचा विचार येतो. या श्लोकांमध्ये हे विचार दुसऱ्या, म्हणजे मुसलमान समाजाकरिता आहेत हे स्पष्टपणाने जाणवते.

सुरुवातीच्याच श्लोकात– तुझ्या पिराने जे सांगितले ते नीट सांग. तो तर नुसता 'शोर' म्हणजे गोंधळ वाटतो. त्याने केलेली चर्चा, फकिरी मानण्याची प्रमाणे, याचे आधार तरी काय आहेत? आणि तू जो 'अल्ला' म्हणतोस तो असतो तरी कोठे? ते सगळ्यांना समजेल असे सांग. तुझ्या गुरूने सांगितलेली स्वर्गाबद्दलची कल्पना स्पष्ट कर, तर ते आम्ही मानू. एरवी तुला साथ कशी देणार? भाई, खुदा कोण, आणि

त्याचा बंदा कोण, ते तर सांग. नुसते चमत्कार हा तर तमाशा आहे, कोणीही जाणता ते मानू शकणारच नाही. तू खऱ्या देवाचा शोध घेतला पाहिजेस. पिराने तसेच म्हटले आहे रे! त्यात चालढकल करू नकोस. तुझ्या पिराचे म्हणणे तू आम्हाला नीट सांगितले नाहीस तर, तुझ्या पिराची प्रतिष्ठा जाईल. तेव्हा त्याने सांगितलेला पंथ कोणता, मंत्र कोणता ते आम्हाला नीट सांग. तो सर्वश्रेष्ठ, एकमेव का ते सांग. ते सिद्ध झाले, तर मी मानीन. मराठीतील असेच विचार पहा : 'जे करामती दाखविती। तेहि गुरू म्हणिजेती, परंतु सद्गुरू नव्हेती मोसदाते ॥' (५×२.१) किंवा, 'जनी देव धुंडाळिता आढळेना॥ जगी मुख्य तो कोण कैसा कळेना।' अथवा, 'जनी थोरला देव तो चोरिलासे। गुरूविण तो सर्वथा न दीसे।' या विचाराशीही काहीसे साम्य आढळते. पण दुसऱ्या पक्षाला हे प्रश्नच विचारलेले असल्याने त्याचे स्वरूप वेगळें आहे. खऱ्या देवाचा शोध व त्याचा मार्ग ही मूळ कल्पना येथेही अभिप्रेत आहे.

पुढच्या चार श्लोकांत खरा देव व त्याचा खरा भक्त या संदर्भात काही विचार येतात ते असे :

'ईलाही' बद्दल जो नेहमी बोलतो त्याला खरे म्हणजे काहीच माहीत नसते. तो आपल्या अभिमानात गर्क असतो. खुदा (देव) हे करितो, ते करितो, असे काहीतरी तो म्हणतो. पण खुदा कोठे असतो ते त्याला माहीत नसते. तो तोंडाने 'अल्ला अल्ला' करीत असतो तो सारा वरचा तमाशा. म्हणून हे बंदे (भक्ता), तू खऱ्या देवाचा शोध घे. नामस्मरणाची व्यर्थ बडबड नको. खऱ्या देवाला अकलेने म्हणजे बुद्धीने जाणायचे असते. ते खऱ्या गुरूच्या पायी शरण गेल्याने समजते. ते जाणशील तेव्हाच तुझा उद्धार होईल.

वरील विचार मराठी वाचकाला अपरिचित नाहीत. समर्थ वाङ्मयातही, मनाचे श्लोक, दासबोध, यात ते येतात. मनाचे श्लोकात एके ठिकाणी समर्थ म्हणतात, 'म्हणे दास सायास त्याचे करावे। जगी जाणता पाय त्याचे धरावे। गुरू अंजनेवीण ते आकळेना। जुने ठेवणे मीपणे कळेना॥' किंवा, 'अहंता गुणे यातना ते फुकाची।' अशा अनेक ओळींतून हे साम्य शोधता येते. ११×२ मध्ये समर्थ म्हणतात, देव, शास्त्र व्रत, विचार, यांचा नुसता बाजार भरला आहे; या गोंधळात खरे काय ते कोणालाच कळत नाहीसे झाले आहे.

याच गुच्छातील पुढल्या श्लोकात म्हटले आहे : खुदा हा हिंदु, मुसलमान कोणत्याच जातीचा, पंथाचा नाही. या सगळयापलीकडचा तो आहे. ब्राह्मणाला वाटते मी मोठा, तर मुसलमान म्हणतो मी सगळयात मोठा. पण खरा मोठा कोणीच नाही. तो खुदा सर्वात मोठा आहे. रामदास म्हणतात, अरे, हे नीट समजावून घे. तो खुदाच खरा आहे. सगळयात देव श्रेष्ठ आहे. मनाचे श्लोकात समर्थ 'थोरला देव' असा शब्दप्रयोग करतात. त्यालाच 'देव राणा' म्हणतात. अशी वैचारिक साम्यस्थळे सापडतातच.

याच हस्तलिखित बाडात आणखी श्लोक आहेत. पण निबंधाची स्थलमर्यादा

लक्षात घेऊन सुमारे पंचवीस श्लोकांचाच विचार येथे केला आहे. श्लोक अप्रकाशित असल्याने, ते प्रसिद्ध करताना अर्थाचा विचार करावाच लागणार आहे. तसेच मूळ संहिताही जशीच्या तशीच प्रसिद्ध करणे भाग आहे. यात कूटस्थळे अथवा मतभेद निर्माण होतील, पण ते अपरिहार्यच आहे.

■ ■

Sources on Ramdas and his verses in Hidusthani language.

Summary

Efforts to collect source material on Ramdas from different places in Maharashtra and outside are going on for the last hundred years or so. As a result, a vast number of manuscripts, illustrated works etc has been discovered. In the last decade of the nineteenth century Babaji Anant Tendulkar published a monthly journal devoted to the publication of material relating to Ramdas entitled, *Shri Samartha Ramadasa Charitra vā Samagra Grantha*. The great work done in this regard by S. S. Deo of Dhule needs special mention. He launched his journal *Ramdas and Ramdasi* mainly for the purpose of publishing the works of Ramdas and old manuscripts relating to his life and works. The material collected by Deo is filed in 2287 *bāds* or bundles and is deposited at Shri Vagdevata Mandir at Dhule in Maharashtra. The source material thus collected at Dhule is in different languages such as Sanskrit, Marathi, Hindusthani etc., and in both Modi and Devnagari scripts. Deo and his associates could hardly get time to classify and catalogue all the material they had collected, and consequently much of the material still remains to be looked into. When all this material will be properly classified, catalogued and fully used by the scholars, it will help throwing more light on the life and times of Ramdas in all its aspects.

In the collection at Vagdevata Mandir at Dhule, a *bād* no. 668 contains copies of verses in Hindusthani language.

Deo has catalogued this *bād* as ' Ramdas' verses (Musalmani).' It appears from the language and other internal evidence that these verses must have been composed by Ramdas for his Muslim audience and followers. Many of the verses here are very close to the verses in his *Manāche shloka*. This *bād* is still unpublished. No other copy of these verses is known to be existing anywhere else. The *bād*, therefore, need to be published with critical annotations.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६१ : १, जुलै १९८२

समर्थ रामदास : एक आगळे दर्शन

उषा रानडे

डेक्कन कॉलेज, पुणे.

'समर्थांचे दर्शन' असे म्हटल्याने, प्रस्तुत लेख म्हणजे तत्त्वज्ञानातला किंव आध्यात्मिक अनुभूतीचा भाग असेल, असे वाटण्याचा संभव आहे. पण तसे नसून, या लेखात समर्थांचे दर्शन घ्यायचे आहे ते एका चित्रातून. हे चित्र समर्थांच्याच एका ग्रंथात आहे. तो म्हणजे दासबोध. मराठेकालीन चित्रकलेच्या अभ्यासाच्या संदर्भात दासबोधाचे एक हस्तलिखित लेखिकेच्या दृष्टीस पडले. त्यामध्ये असलेले समर्थांचे चित्र सध्या उपलब्ध असलेल्या त्यांच्या चित्रांपेक्षा अगदी वेगळया शैलीतील, आणि म्हणूनच दर्शनीय आहे. त्या चित्राचा परिचय प्रस्तुत लेखात करून देण्यात आलेला आहे.

समर्थांच्या या सचित्र दासबोधाचा परिचय करून घेण्यापूर्वी त्यांच्या संप्रदायाचे धर्मप्रसारामागचे सूत्र ध्यानात घ्यावयास हवे. हिंदुधर्माच्या प्रचारासाठी समर्थांनी उत्तरेतील काशीपासून दक्षिणेतील तंजावरापर्यंत सुमारे अकराशे मठ स्थापले. या मठांतून व्यवस्थेसाठी त्यांनी आपले शिष्य नेमले. या शिष्यांच्या हाताखाली जे विद्यार्थी असत त्यांना, कीर्तनश्रवणाबरोबर अध्ययनासाठी ग्रंथ लागत. समर्थांच्या काळात मुद्रणकला महाराष्ट्रात अस्तित्वात नसल्याने, त्यांचे शिष्य त्यांना लागणारे ग्रंथ हाताने नकलवून घेत. या ग्रंथांचे संग्रह समर्थांच्या मठातून उपलब्ध होते व आजही आहेत. समर्थांच्या मठांतून केवळ समर्थांचेच ग्रंथ नव्हेत, तर त्यांना समकालीन अशा इतर संतांच्या वाङ्मयाची हस्तलिखितेही नकलवून घेतलेली आढळतात. पूर्वी बौद्ध धर्माचे मठ, प्रचारक, भिक्षुभिक्षुणी आणि मठांतील ग्रंथसंग्रह, यातून नालंदा, तक्षशिला यांच्यासारखी विद्यापीठे निर्माण झाली. तसेच जैन देवळांना लागून असणारी भांडारे हस्तलिखितांनी संपन्न झाली. अगदी याच प्रकारे समर्थांचे मठ म्हणजे जणू विद्यापीठेच होती.

समर्थांच्या मठांतील बरेचसे वाङ्मय समर्थभक्त कै. शंकरराव देव यांच्या संशोधनकार्यामुळे धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरात जमा झालेले आहे. त्यातूनच पुढे दासबोधाची आवृत्ती तयार झाली. लेखिका ही वाङ्मयापेक्षा चित्रकलेची मुख्यतः विद्यार्थिनी आहे. डोमगावच्या समर्थमठात दासबोधाची एक सचित्र हस्तलिखित प्रत असल्याचे कळल्यावरून ती डोमगावला गेली. हे हस्तलिखित डोमगावचे सध्याचे मठपती श्री. बाबासाहेब जहागिरदार यांच्या ताब्यात असून, त्यामध्ये असणाऱ्या चित्रांमुळे ते

वैशिष्ट्यपूर्ण आहे. या चित्रांपैकी एका चित्रात लेखिकेला समर्थांचे एक आगळे दर्शन घडले.

दासबोधाची वरील प्रत कल्याणशिष्य केशवस्वामी यांच्या हातची आहे. या पोथीचा लेखनकाल गतकली ४७९५ म्हणजे शक १६१६ असा दिला आहे. तिथी माघ शु. १ आणि संवत्सर बहुधान्य असे दिलेले आहे. पण शके १६१६ मध्ये माघ शु. १ ला बहुधान्य संवत्सर नव्हते. हे संवत्सर शके १६२० च्या माघ शु. १ ला होते. म्हणून पोथीचा लेखनकाल शक १६२० म्हणजे इ. स. १६९९ असला पाहिजे. संध्येच्या चोवीस नावांपैकी पहिले नाव केशव ते लेखकाचे, असा उल्लेख खुद्द लेखकाने स्वतःबद्दल केला आहे. कल्याणांच्या बेचाळीस शिष्यांपैकी केशवस्वामी हे एक होतें. ते उंब्रज येथील मठाधिपती होते. तेथील मठातही केशवस्वामींच्या हातची ग्रंथराज दासबोधाची दुसरी एक प्रत असून, तिचा लेखनकाल शक १६२४ म्हणजे इ. स. १७०२ किंवा १७०३ हा आहे. या लेखात जिचा विचार केलेला आहे त्या केशवस्वामींच्या हातच्या डोमगावच्या प्रतीचे प्रत्यक्ष लेखन मात्र अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे झाले. यावरून, समर्थांचा एखादा मठ कर्जतमध्ये होता की काय अशी शंका येते. परंतु जळगाव येथील प्रा. इंदुमती लिमये यांनी समर्थांचे मठ दाखविणारा जो नकाशा तयार केला आहे, त्यात कर्जतला मठ असल्याचा निर्देश आढळत नाही.

डोमगावची दासबोध प्रत समर्थांनी लेखनासाठी घालून दिलेल्या नियमांप्रमाणे तयार झालेली आहे. दासबोधाच्या ' लेखनक्रिया ' समासात लेखकासाठी, कागद कोणता घ्यावा, अक्षरे कशी काढावीत, दोन ओळींत अंतर किती सोडावे येथपासून ते चित्रे काढावीत व पोथीच्या दोन फळया ' चित्री चिताराव्या, ' येथपर्यंतच्या सूचना आहेत. त्यानुसार डोमगावची पोथी लिहिलेली आहे. १५ सें. मी × ७ सें. मी. आकाराचे पांढरे, काळसर, हिरवे असे कागद पोथीसाठी वापरले आहेत. पोथीच्या प्रत्येक पानावर कडेला २ सें. मी. पट्टी वेलबुट्टीसाठी सोडली आहे. मजकुराच्या प्रत्येक पानावर रुपेरी सोनेरी शाईने नऊ ओळींचा मजकूर लिहिलेला आहे व चित्रेही सोनेरी शाईची आहेत. अशाच सोनेरी अक्षरात लिहिलेल्या काही पोथ्या पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात आणि औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठात आढळतात.

सदर पोथीत एकूण सव्वीस चित्रे आहेत. विषयाच्या दृष्टीने त्यांचे तीन भागांत वर्गीकरण करता येईल-(१) पारंपरिक (२) मूळ विषयाशी संबंधित (३) तत्कालीन संस्कृति-निदर्शक. पारंपरिक चित्रांत देवदेवतांच्या चित्रांचा अंतर्भाव होतो. कोणत्याही धार्मिक ग्रंथाची सुरुवात ही श्रीगणेशाच्या वंदनाने होते. त्याप्रमाणे डोमगावच्या पोथीत प्रथम गणपती व ऋद्धी-सिद्धी यांचे एक व शारदेचे दुसरे अशी दोन चित्रे सुरुवातीला येतात. नंतर, पोथीचा विषय कोणताही असो, त्यात दशावताराची चित्रे यायचीच, तशी या पोथीतही दहा चित्रे आहेत. शिवाय मूर्तिविज्ञानाच्या कक्षेत बसणारी सुटी देवताचित्रे आहेत. यानंतर दासबोधाला धरून असणारी रामपंचायतन, रामदास-कल्याण, रामदास व इतर साधू, अशी चित्रे आहेत. रामदासांच्या ठोसर घराण्यात सूर्योपासना परंपरागत

होती, म्हणून सात अश्वांच्या रथात बसलेल्या सूर्याचे चित्र पोथीत आढळते. तत्कालीन संस्कृति-निदर्शक चित्र म्हणजे पुंडलिकाचे. या चित्रात चार व्यक्ती आहेत. त्यांपैकी दोन झोपलेल्या आहेत, तिसरी पाय चेपते आहे व चौथी दूर अंतरावर कमरेवर हात ठेवून उभी आहे. कै. शंकरराव देवांच्या मते, झोपलेल्या व्यक्ती राम व सीतामाई असून, रामदास त्यांचे पाय चेपत आहेत. पण हे मत बरोबर वाटत नाही. पाय चेपणारी व्यक्ती पुंडलिक असून, तो आपल्या आईवडिलांचे पाय चेपत आहे. कमरेवर हात ठेवणारी मूर्ती विठोबाचीच आहे. पोथीच्या मूळ विषयाशी संबंधित नसलेले हे चित्र तत्कालीन मराठी संस्कृतीचे निदर्शक आहे. त्या काळी मराठी समाजावर भक्तिमार्गी वारकरी पंथाचा पगडा बसत चालल्याचे हे चित्र द्योतक आहे. अन्यथा या चित्राचे प्रयोजन काय ?

या चित्रांपैकी समर्थांचे दर्शन घडविणारे जे मुख्य चित्र आहे त्यात तीन आकृती आहेत. मध्यभागी आदिलशाही पोशाखातील एक व्यक्ती बसलेली आहे. तिची आकृती इतर सर्वांपेक्षा मोठी आहे. तिच्यासमोर एक साधू काहीतरी लिहून घेत आहे. तिच्या मागे छत्र धरणारा एक सेवक आहे. आदिलशाही पोशाखातील व्यक्तीचे चित्र समर्थांचे आहे. आदिलशाही पोशाखातील म्हणण्याचे कारण, चित्रशैलीच्या दृष्टीने आदिलशाही काळाशी साम्य दाखविणारा त्यांचा वेष आहे. त्यांच्या समोरील लिहून घेणारा साधू म्हणजे त्यांचा शिष्य कल्याण होय. समर्थांचा दासबोध कल्याणांनी लिहून घेतला ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

समर्थांचा आदिलशाही पोशाख पाहून बिचकण्याचे कारण नाही. समर्थांचे कौपीनधारी अवस्थेतील सध्या प्रचलित असणारे एकच चित्र आपणास ज्ञात आहे. पण समर्थांच्या शिष्यांनी, समकालीनांनी व त्यांच्या परंपरेतील अनुयायांनी आपल्या ग्रंथात समर्थांच्या पोशाखांची जी वर्णने दिली आहेत ती पाहता, समर्थ निरनिराळ्या प्रसंगी निरनिराळे वेष धारण करीत असल्याचे दिसून येते. तीर्थयात्रेच्या निमित्ताने समर्थ पैठणला आले तेव्हा नाथांसारखा वेष त्यांनी धारण केल्याचे वर्णन हनुमानस्वामींनी आपल्या बखरीत केलेले आहे. पायात पादुका, हाती माळ, गळा मेखला, मस्तकी जटाभार, त्यावर टोप, काखेत कुबडी, अंगावर हुर्मुजी रंगाची वस्त्रे, पाठीशी गलोल, असा त्यांचा वेष असे. समर्थांनी आपल्या मातोश्रींना याच पोशाखात दर्शन दिले. अनंत कवी, गिरिधर, मेरुस्वामी, तुकाराम यांनी समर्थांचे याच परीने वर्णन केलेले आहे. गिरिधर म्हणतात,

> कौपिनावरुता पीतांबर। लीळा कासिला चिदंबर
> आपाद मुक्तमाळा मनोहर। मुक्तपणा नातळती ।।
> आपाद सुमनमाळा विराजती। नाना पर्णमाळा हरित शोभती
> नवरत्नमाळा विविधा दिसती। करांगुळी झळकती निजमुद्रिका ।।

भारतातील चित्रकलेची व शिल्पकलेची परंपरा पाहिली तर तिच्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते. ती म्हणजे, एखाद्या राजाचे किंवा मोठया माणसाचे चित्र किंवा

शिल्प काढावयाचे झाले तर चित्रात किंवा शिल्पात त्याची आकृती इतर आकृत्यापेक्षा मोठी काढत. केशवस्वामींनी लिहिलेल्या डोमगावच्या दासबोधाच्या प्रतीत समर्थांची आकृती चित्रातील तीन आकृत्यांपेक्षा मोठी दाखविली आहेच, शिवाय तिच्या अंगावर बादशाही वेष चढवून त्यांचा निराळेपणा व मोठेपणा दाखविण्याचा चित्रकाराने प्रयत्न केलेला आहे. मात्र यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीही नाही. अठराव्या शतकातील चित्रकलेचा, विशेषतः पोथ्यांचा अभ्यास केला, तर भागवत पुराण, महाभारत, यातील नंद, वसुदेव ही मंडळी मुघल पोशाखातच दिसतील. आणखी एक गोष्ट अशी की, डोमगावचे दासबोधाचे हस्तलिखित केशव स्वामींच्या हातचे आहे, पण त्यातील चित्रे त्यांनी स्वतः काढली की दुसऱ्या कोणाकडून काढवून घेतली हे ठरविणे कठीण. जर त्यांनी स्वतः काढली असतील तर त्यांना समर्थांचे या वेषात दर्शन झाले असेल किंवा ती एक अनुभूती असेल. जर चित्रकार दुसरा कोणी असेल तर इतके म्हणता येईल की तो आदिलशाही काळातील राजवेषाशी, संस्कृतीशी परिचित असला पाहिजे. आणि यात आश्चर्य वाटण्याजोगे काय आहे ? कारण खुद्द शिवाजीमहाराजांचा आदिलशाही पोषाख आपण मान्य केलेला नाही काय ? महाराजांच्या आदिलशाही पोषाखात आपणास गैर काहीच वाटत नाही. मग केशव स्वामींच्या डोळ्यांसमोर आदिलशाही वेषातील समर्थ आले तर त्यात काहीच आश्चर्य नाही. कदाचित् ती त्यांची अनुभूती असू शकेल तरी पण तिचे आपणाला घडणारे दर्शन आगळे व लोभस आहे यात शंका नाही.

■ ■

A unique portrait of Ramdas Swami

Summary

The article makes a study of Ramdas Swami as he appears in his portrait in the manuscript copy of Dasbodh, preserved in Ramdas's Math at Domgao. The manuscript was copied by Keshav Swami, a disciple of Kalyan Swami, in the year 1699 in the village Karjat in Ahmednagar district.

The manuscript contains numerous illustrations, the unique among them being that of Ramdas Swami in Adil Shahi dress, with a chhatra on his head, shown along with his disciple Kalyan Swami. The picture is in silver and golden ink on a green paper.

There is nothing surprising in the picture, even though it may shock the people in general. There are references in the



समर्थ रामदास – एक आगळे दर्शन

(डोमगावच्या समर्थ मठातील दासबोधाच्या प्रतीतील एक चित्र)

literature of the Swami's disciples and contemporary Marathi saints that the Swami used to wear different kinds of garments on different occasions. Hence the picture seems to be an authentic one.

The picture was portrayed either by Keshav Swami or by some other painter. If the painter was Keshav Swami, it was possible that he tried to portray Ramdas as he saw the Swami actually or in some spiritual experience. If the painter was some other person, he was defintely familiar with Adil Shahi culture. Following the customs of his days in the field of art, he tried to show Ramdasa's greatness by drawing the figure of the Swami of a size greater than that of other figures in the picture, and also by portraying him in Adil Shahi royal dress.

■ ■ ■

भा. इ. सं. मं. त्रैमासिक ६१ : १, जुलै १९८२

मराठ्यांच्या उत्तरेतील मुलकी कारभाराविषयी काही हिंदी कागदपत्रे

सुशीला शास्त्री
मुंबई पुराभिलेखागार, मुंबई.

उत्तर हिंदुस्थानात स्वाऱ्या करून तेथे मराठ्यांची सत्ता स्थापन करण्याची कामगिरी केली ती पेशवा पहिला बाजीराव आणि त्याचे शिंदे, होळकरादी सरदार यांनी. यासंबंधीचा पत्रव्यवहार, पुणे येथील पुराभिलेखागारातील (जुन्या पेशवे–दप्तरातील) अनेक कागदपत्रे निवडून, ' पेशवे–दप्तरातील निवडलेले कागद ' या शीर्षकाखाली कै. रियासतकार सरदेसाई यांनी प्रसिद्ध केला. या पत्रव्यवहारात मराठ्यांच्या उत्तरेकडील राज्यकारभाराविषयीची माहिती अभावानेच आढळते. तथापि पुणे पुराभिलेखागाराच्या संग्रहातील हिंदी कागदपत्रांतून ही माहिती थोडीफार उपलब्ध होते. प्रस्तुत टिपणात त्या संग्रहातील काही निवडक हिंदी कागदपत्रांच्या आधारे मराठ्यांच्या उत्तरेतील मुलकी कारभाराचे ओझरते दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो करताना कागदपत्रांचा तारीखवार उल्लेख केला आहे.

